मा.उच्च न्यायालयाच्या स्थगितीच्या अनुषंगाने कांदळवनापासून ५० मिटर अंतराच्या आतमधील काही भूखंडधारकांना ताबा देण्यात आलेला नाही. सद्यस्थितीत मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करावयाची शक्यता आहे. जे लाभार्थी अधिमुल्याची रक्कम परत मिळणेबाबत विनंती करतील, अशा लाभार्थींना भरणा केलेल्या रकमेचा प्रचालित व्याजदराने परतावा करावा, असा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे.

उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने ज्या लाभार्थ्यांनी भूखंडाच्या अधिमूल्यापोटी रकमेचा भरणा केलेला आहे अशा लाभार्थ्यांनी कृपया जागतिक बँक प्रकल्प चौथा मजला येथे मूळ पावतीसह संपर्क साधावा.